दि. २८/०९/२०२२ रोजी तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई मार्फत झेवियर्स इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग, माहिम, मुंबई या संस्थेत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या प्रतिनिधीकरिता आयोजित केलेल्या ओरिएंटेशन प्रोग्रॅमचे

## <u>इतिवृत्त</u>

- दि. २८/०९/२०२२ रोजी तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई मार्फत झेवियर्स इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग, माहिम, मुंबई या संस्थेत सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या प्रतिनिधींकरिता आयोजित केलेल्या "ओरिएंटेशन प्रोग्रॅमसाठी" उपस्थित असलेल्या संस्थांचे प्राचार्य/प्रबंधक/प्रतिनिधींना प्रथमतः ओरिएंटेशन प्रोग्रॅमचे महत्त्व सांगून सर्व उपस्थित प्रतिनिधींचे सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबईतर्फे श्री. किशोर मानकर, अधीक्षक यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहिल्याबाबत स्वागत करण्यांत आले.
- सदर कार्यक्रमासाठी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयामार्फत संस्थांना मार्गदर्शन करण्याकरिता सौ. शर्वरी नि. ढेपे, सहाय्यक संचालक (तां), श्री. योगेश बी. जामनिक, विशेष कार्य अधिकारी, डीबीटी सेल, श्री. किशोर मानकर, अधीक्षक, सौ. श्वेता कासारे, श्री. चेतन घारे, श्री. नितीन चव्हाण (डीबीटी सेल प्रतिनिधी) उपस्थित होते. तसेच विशेष अतिथी डॉ. शिवाजीराव घुंगरड, प्राचार्य सेंट झेवियर्स इन्स्टिट्यूट (तंत्रनिकेतन), माहिम मुंबई व श्री. चंद्रकांत जाधव, प्रबंधक, इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजि., कोपरखैरणे, नवी मुंबई (डीबीटी पोर्टलचे प्रात्यक्षिक देण्याकरिता विशेष आमंत्रित) यांना आमंत्रित करण्यांत आले होते.
- ओरिएंटेशन प्रोग्रॅम सुरु करण्याच्या आधी डीबीटी सेलचे विशेष कार्यकारी अधिकारी श्री. योगेश जामनिक यांनी उपस्थित असलेल्या संस्थांच्या प्रतिनिधींना मागिल शैक्षणिक वर्षातील (शै.व. २०२०-२१ व २०२१-२२) प्रलंबित असलेल्या अर्जांवर तातडीने कार्यवाही करुन सर्व प्रकारचे अर्ज डीबीटी पोर्टलवर **निरंक** कसे करता येतील. याबाबत मार्गदर्शन केले. तसेच ज्या संस्था मागिल वर्षातील प्रलंबित अर्जांवर कार्यवाही न करता पुन्हा अर्ज तसेच प्रलंबित ठेवतील अशा संस्थांवर नियमानुसार कार्यवाही तर करण्यांत येईलच परंतु अशा संस्थांचे प्रलंबित अर्ज जोपर्यंत **निरंक** होणार नाहीत तोपर्यंत शै.व. २०२२-२३च्या अर्जांवर सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयामार्फत पुढील कार्यवाही होणार नाही. अशा सूचना दिल्या.
- श्री. जामनिक सरांनी सर्व उपस्थित असलेल्या प्रतिनिधींपैकी ज्या संस्थांमध्ये साधारण ८०० ते १२०० विद्यार्थ्यांनी डीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज केलेले आहेत. परंतु अशा संस्थांमध्ये एकही अर्ज प्रलंबित राहिलेला नसल्याचे नमूद करुन ज्या संस्थांनी अर्ज प्रलंबित ठेवलेले नाहीत अशा ५ संस्थांच्या प्रतिनिधींपैकी २ संस्थांच्या प्रतिनिधींना त्यांनी केलेली कार्यवाही विषद करण्यास सांगितले. त्यानुसार दोन्ही संस्थांच्या प्रतिनिधींनी सांगितले की, त्यांनी Sent back केलेल्या अर्जदार विद्यार्थ्यांशी सतत संपर्क ठेवला होता व जे विद्यार्थी विहीत कालावधीत अर्ज सादर करत नाहीत अशा विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन करुन अशा विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांची विहीत कालावधीत पूर्तता करवून घेऊन त्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले. तसेच जे विद्यार्थी अर्जासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची विहीत कालावधीत पूर्तता करणार नाहीत त्यांना त्यांचे अर्ज रद्द करण्यास सांगण्यात आले. त्यामुळे त्यांच्या संस्थेकडे प्रलंबित अर्जांची संख्या निरंक आहे. याबाबत जामनिक सरांनी सर्व संस्थांना सूचित केले की, अशाचप्रकारे सर्व संस्थांनी विहीत कालावधीत विद्यार्थ्यांकडे पाठपुरावा करुन प्रलंबित अर्जांची संख्या निरंक ठेवावी.

...२.

- कार्यक्रमास उपस्थित असलेले विशेष अतिथी डॉ. शिवाजीराव घुंगरड, प्राचार्य सेंट झेवियर्स इन्स्टिट्यूट (तंत्रनिकेतन), माहिम मुंबई यांनी सर्व संस्थांच्या प्रतिनिधींनी आपआपली जबाबदारी पार पाडताना विशेष लक्ष देऊन पार पाडावी. तसेच सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाला डीबीटी सेलचे कामकाज पार पाडताना कशाप्रकारचा ताण असतो ? याबाबत आपले मनोगत व्यक्त केले. त्यामुळे सर्व संस्थांच्या प्रतिनिधींनी आपआपली जबाबदारी सांभाळून डीबीटी पोर्टलचे काम सुव्यवस्थित कसे करता येईल याकडे लक्ष द्यावे व सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाला वेळोवेळी सहकार्य करावे. याबाबतचे विशेष मार्गदर्शन केले.
- तद्नंतर सौ. शर्वरी नि. ढेपे, सहाय्यक संचालक (तां), यांनी सर्व उपस्थित असलेल्या प्रतिनिधींना संबोधित करताना सांगितले की, तंत्रशिक्षण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीचे अर्ज डीबीटी पोर्टलवर मंजूर करताना शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार योग्य ती शहानिशा करुनच अर्ज पुढील कार्यवाहीसाठी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाच्या लॉगीन कडे पाठवावेत. तसेच गेल्या शैक्षणिक वर्षातील प्रलंबित अर्ज कोणत्याही परिस्थितीत प्रलंबित न ठेवता ते निरंक कसे करता येतील याकडे प्रकर्षाने लक्ष द्यावे. सर्व संस्थांनी विहीत कालावधीत पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज संस्था स्तरावर प्रलंबित न ठेवता नियम व निकषांनुसार पुढील कार्यवाहीसाठी पाठवावेत.
- काही संस्थांमध्ये डीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्तीचे काम करणारे प्रतिनिधी अचानक बदलले जातात व नविन प्रतिनिधींची नेमणूक करण्यांत येते. याबाबत श्री. किशोर मानकर, अधीक्षक यांनी ज्या संस्थांचे नविन प्रतिनिधी असतील अशा संस्थांच्या प्रतिनिधींना उपस्थिती नोंदीमध्ये त्यांच्या नव्याने केलेल्या नियुक्तीबाबत तसे नमूद करण्याच्या सूचना देऊन अशा प्रतिनिधींनी डीबीटीचे कामकाजामध्ये कौशल्य मिळविण्याकरिता सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाच्या संपर्कात राहून डीबीटी पोर्टलचे कामकाज समजून घेण्याबाबत आवाहन केले.
- सदर ओरिएंटेशन प्रोग्रॅममध्ये संस्थांनी डीबीटी पोर्टलद्वारे संस्थेचे प्रोफाईल कसे अद्ययावत करावे. तसेच सदर पोर्टलवर शुल्क अद्ययावत करतांना नेमकी कोण-कोणती काळजी घ्यावी ? तसेच विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज कशाप्रकारे भरुन घ्यायचा ? याचे ऑनलाईन प्रशिक्षण देण्याकरिता श्री. चंद्रकांत जाधव, प्रबंधक, इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजि., कोपरखैरणे, नवी मुंबई यांना विशेष आमंत्रित करण्यांत आले होते. त्यानुसार श्री. जाधव सरांनी उपस्थित असलेल्या सर्व प्रतिनिधींना संस्थांचे प्रोफाईल, संस्थांनी डीबीटी पोर्टलवर शुल्क अद्ययावत करतानां नेमकी कोणती काळजी घ्यावी ? याबाबत मार्गदर्शन केले व प्रत्यक्ष ऑनलाईन प्रात्यक्षिकही करुन दाखविले. तसेच विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज कशाप्रकारे भरुन घ्यावा ? याबाबतचे प्रात्यक्षिक ऑनलाईनरित्या दाखविण्यांत आले. तसेच या सर्व बाबींचे प्रात्यक्षिक देत असतांना संस्थांच्या प्रतिनिधींमार्फत विचारल्या जाणाऱ्या अडचणींना/प्रश्नांना श्री. जाधव सरांनी समर्पक उत्तरे देऊन संस्थांच्या प्रतिनिधींच्या सर्व शंकांचे निरसन केले.
- तद्नंतर श्री. योगेश जामनिक सरांनी एनएसपी **(National Scholarship Portal)** वरील सर्व प्रकारच्या योजनांबाबतची सविस्तर माहिती देऊन ज्या संस्थांनी सदर पोर्टलकरिता त्यांचा केवायसी **(KYC)** देऊन अद्याप नोंदणी केलेली नसेल अशा संस्थांनी तात्काळ सदर पोर्टलवर संस्थांची नोंदणी करावी. काही अडचण आल्यास सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयातील प्रोग्रॅमर यांच्याशी संपर्क साधून अडचणीचे निराकरण करुन घेऊन तात्काळ संस्थांना नोंदणी करण्याचे आवाहन केले.

...३.

- श्री. जाधव सरांनी डीबीटी पोर्टलवरील सर्व योजनांबाबत जे प्रात्यक्षिक दिले; त्या योजनांचे नियम व निकषांबाबतची उजळणी म्हणून कार्यक्रमाच्या शेवटी श्री. जामनिक सरांनी सर्व उपस्थितांना पीपीटीद्वारे (Power point presentation द्वारे) पुन्हा माहिती करुन दिली. तसेच श्री. जामनिक सरांनी सर्व उपस्थित प्रतिनिधींना सूचित केले की, या कार्यालयातर्फे सदर योजनांबाबतचे FAQ (सतत विचारले जाणारे प्रश्न) त्यानुषंगाने दिलेली उत्तरे सर्वच संस्थांनी एकदा अभ्यासावेत. जेणेकरुन जे प्रतिनिधी डीबीटी पोर्टलचे काम नेहमी हाताळतात त्यांची उजळणी होईल तर जे नविन प्रतिनिधी आहेत. त्यांना येणाऱ्या शंकाचे निरसन होण्यास मदत होईल.
- कार्यक्रमाच्या शेवटी श्री. किशोर मानकर, अधीक्षक यांनी डॉ. शिवाजीराव घुंगरड, प्राचार्य सेंट झेवियर्स इन्स्टिट्यूट (तंत्रनिकेतन), माहिम मुंबई व प्राचार्य, झेवियर्स इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंग, माहिम, मुंबई यांचे व त्यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानून उपस्थित असलेल्या संस्थांच्या प्रतिनिधींनी संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शांतपणे व संयमितपणे उपस्थित राहून माहिती करुन घेतल्याबद्दल आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थित प्रतिनिधींना या वर्षापासून मुंबई विभागांतर्गतच्या संस्थांमधील प्रलंबित अर्जांबाबतचा अहवाल निरंक ठेवण्याबाबतचे आवाहन करुन कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहिर केले.

**(योगेश जामनिक)**
विशेष कार्यकारी अधिकारी, डीबीटी सेल,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

**(शर्वरी नि. ढेपे)**
सहाय्यक संचालक (तां)
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई